गृह विभाग-मागणी क्र. बी-१०, ४०७०, इतर प्रशासनिक सेवांवरील भांडवली खर्च, ००, ८००, इतर खर्च, (००) (००)(०७) पोलिसांकरिता भूसंपादन आणि इमारतीचे बांधकाम यांवरील खर्च (कार्यक्रम) (४०७० ०१४२), ५३-मोठी बांधकामे, या तपशीलवार लेखाशीर्षाखाली सन २०१८-१९ या वित्तीय वर्षाच्या सुधारित अंदाजात *(Revised Estimates)* प्राप्त झालेले अधिकचे अनुदान वितरित करणे व खर्च करणे यांकरिता मंजुरी देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग

शासन निर्णय क्रमांक पूरक-०११९/ प्र.क्र.२६/ पोल-७.
मंत्रालय, दुसरा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई-४०००३२.

दिनांक ०६ मार्च २०१९.

वाचा :-
१) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र. अर्थसं-२०१८/ प्र.क्र.६९/ अर्थ-३, दिनांक ०२.०४.२०१८.
२) शासन निर्णय, गृह विभाग, क्र. विनियो-०५१८/ प्र.क्र.२०४/ पाच/ पोल-७, दिनांक २८.०६.२०१८.
३) शासन शुद्धिपत्र, गृह विभाग, क्र. विनियो-०५१८/ प्र.क्र.२०४/ पाच/ पोल-७, दिनांक ०९.०८.२०१८.
४) शासन ज्ञापन, गृह विभाग, क्र. जमीन-१२१८/ प्र.क्र.४८७/ पोल-७, दिनांक ०२.०१.२०१९.
५) पोलीस महासंचालक, म.रा., यांच्या कार्यालयाचे पत्र क्र. पोमसं/ २७-अ/ फेब्रुवारी-२०१९/ पूरक-मागणी/ ६६/ २०१८, दिनांक २२.०१.२०१९.
६) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र. अर्थसं-२०१८/ प्र.क्र.६९/ अर्थ-३, दिनांक २५.०१.२०१९.

प्रस्तावना.

सन २०१८-१९ या वित्तीय वर्षाच्या अर्थसंकल्पात *गृह विभाग-मागणी क्रमांक बी-१०, ४०७०, इतर प्रशासनिक सेवांवरील भांडवली खर्च, ००, ८००, इतर खर्च, (००) (००)(०७) पोलिसांकरिता भूसंपादन आणि इमारतीचे बांधकाम यांवरील खर्च (कार्यक्रम) (४०७० ०१४२),*

५३-मोठी बांधकामे या तपशीलवार लेखाशीर्षाखाली ₹२० कोटी *(रुपये वीस कोटी फक्त)* इतके अनुदान मंजूर करण्यात आले होते. त्यापैकी ७० टक्के अनुदान अर्थात ₹१४ कोटी *(रुपये चौदा कोटी फक्त)* हे वितरित व खर्च करणे यांकरिता शासन निर्णय, गृह विभाग, क्र. विनियो-०५१८/ प्र.क्र.२०४/ पाच/ पोल-७, दिनांक २८.०६.२०१८ *(शासन शुद्धिपत्र, दिनांक ०९.०८.२०१८, यासह वाचावे)*, द्वारे मंजुरी देण्यात आली होती. त्यानंतर, शासन निर्णय, गृह विभाग, क्र. एलएनडी-०९१५/ प्र.क्र.३६९/ पोल-७, दिनांक १६.०१.२०१९, द्वारे बाकी ३० टक्के अनुदान अर्थात ₹६ कोटी *(रुपये सहा कोटी फक्त)* वितरित व खर्च करणे यांकरिता मंजुरी देण्यात आली.

२. उक्त ₹२० कोटी रकमेपैकी ₹३३,५७,०३८/- इतकी रक्कम शिल्लक आहे, असे पोलीस महासंचालक, म.रा., यांच्या कार्यालयाने दिनांक २२.०१.२०१९ रोजीच्या पत्राद्वारे कळविले आहे. तसेच, पुढील तक्त्यातील स्तंभ (२) मध्ये नमूद केलेल्या बाबींसाठी स्तंभ (३) मध्ये निर्दिष्ट केल्याप्रमाणे आणखी एकूण ₹३०,६४,२९,५६३/- इतका निधी आवश्यक आहे असेही पोलीस महासंचालक, म.रा., यांच्या कार्यालयाच्या उक्त पत्रात नमूद करण्यात आले आहे:-

अ.क्र. *(१)*	बाब *(२)*	रक्कम *(३)*
१.	पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, यांच्या आस्थापनेवरील बांगूरनगर पोलीस ठाणे याच्या इमारतीकरिता आरक्षित असलेली मालाड (पश्चिम) येथील जमीन संपादन.	₹४,०४,३४,१५२/-
२.	पोलीस अधीक्षक, पुणे (ग्रामीण), यांच्या अधिपत्याखालील एलएक्यू-९१, लोणावळा विकास योजनेतील आ.क्र.३५ ही पोलीस कवायत मैदान याकरिता भूसंपादन आणि एलएक्यू-९२, लोणावळा विकास योजनेतील आ.क्र.२८ ही पोलीस ठाणे इमारत बांधकाम याकरिता भूसंपादन.	₹२५,४२,८४,१६२/-
३.	पोलीस अधीक्षक, गडचिरोली, यांच्या अधिपत्याखालील, (प्रस्तावित) पोलीस मदत केंद्र, सुरजागड आणि पोलीस उप मुख्यालय, प्राणहिता, यांच्याकरिता नवीन प्रशासकीय इमारतींचे बांधकाम करणे यांसाठी मंजूर करण्यात आलेल्या वन जमिनींच्या बाबतीत *“Net Present Value,” “Compensatory Afforestation charges”* व *“Cost of tree felling”* यांचा भरणा करणे.	₹१,१७,११,२४९/-
एकूण-		**₹३०,६४,२९,५६३/-**

३. उक्त ₹३३,५७,०३८/- इतकी शिल्लक विचारात घेता परिच्छेद २ मधील तक्त्यातील स्तंभ (२) मधील बाबींसाठी एकूण ₹३०,३०,७२,५२५/- *(३०६४२९५६३ - ३३५७०३८)* इतकी

रक्कम पूरक अनुदानाद्वारे उपलब्ध करुन देण्याची विनंती पोलीस महासंचालक, म.रा., यांनी केली होती.

४. महाराष्ट्र विधानमंडळाच्या सन २०१९ च्या पहिल्या (अर्थसंकल्पीय) अधिवेशनात उक्त पूरक मागणी मंजूर झाली नाही. तथापि, सन २०१८-१९ या वित्तीय वर्षाच्या सुधारित अंदाजांमध्ये *(Revised Estimates)* वर नमूद केलेल्या तपशीलवार लेखाशीर्षाखाली ₹३०,३०,७२,०००/- *(रुपये तीस कोटी, तीस लक्ष, बाहत्तर हजार फक्त)* इतके अधिकचे अनुदान उपलब्ध करण्यात आले आहे. हे अधिकचे अनुदान वितरित करणे व खर्च करणे यांकरिता मंजुरी देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय.

सन २०१८-१९ या वित्तीय वर्षाच्या सुधारित अंदाजांमध्ये *(Revised Estimates),* गृह *विभाग-मागणी क्रमांक बी-१०, ४०७०, इतर प्रशासनिक सेवांवरील भांडवली खर्च, ००, ८००, इतर खर्च, (००) (००)(०७) पोलिसांकरिता भूसंपादन आणि इमारतीचे बांधकाम यांवरील खर्च (कार्यक्रम) (४०७० ०१४२), ५३-मोठी बांधकामे* या तपशीलवार लेखाशीर्षाखाली प्राप्त झालेले अधिकचे अनुदान ₹३०,३०,७२,०००/- *(रुपये तीस कोटी, तीस लक्ष, बाहत्तर हजार फक्त)* वितरित करण्यास, याद्वारे, मंजुरी देण्यात येत आहे.

२. उक्त रक्कम अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई, येथून काढून ती संबंधितांना उपलब्ध करुन देण्याच्या प्रयोजनासाठी पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई, यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

३. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई, यांनी उक्त रक्कम पुढील बाबींवर खर्च करावी:-

१) पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, यांच्या आस्थापनेवरील बांगूरनगर पोलीस ठाणे याच्या इमारतीकरिता आरक्षित असलेली मालाड (पश्चिम) येथील जमीन संपादन.

२) पोलीस अधीक्षक, पुणे (ग्रामीण), यांच्या अधिपत्याखालील एलएक्यू-९१, लोणावळा विकास योजनेतील आ.क्र.३५ ही पोलीस कवायत मैदान याकरिता भूसंपादन आणि एलएक्यू-९२, लोणावळा विकास योजनेतील आ.क्र.२८ ही पोलीस ठाणे इमारत बांधकाम याकरिता भूसंपादन.

३) पोलीस अधीक्षक, गडचिरोली, यांच्या अधिपत्याखालील, (प्रस्तावित) पोलीस मदत केंद्र, सुरजागड आणि पोलीस उप मुख्यालय, प्राणहिता, यांच्याकरिता नवीन प्रशासकीय इमारतींचे बांधकाम करणे यांसाठी मंजूर करण्यात आलेल्या वन जमिनींच्या बाबतीत *"Net Present Value," "Compensatory Afforestation charges"* व *"Cost of tree felling"* यांचा भरणा करणे.

४. *"पोलिसांकरिता भूसंपादन आणि इमारतीच्या बांधकामावरील खर्च"* ही नवीन योजना नाही. या योजनेखाली प्रत्येक वित्तीय वर्षात निधी उपलब्ध करुन देण्यात येत असतो. तसेच, या योजनचे स्वरूप व व्याप्ती यांमध्ये बदल झालेला नाही.

५. हा शासन निर्णय, शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र. अर्थसं-२०१८/ प्र.क्र.६९/ अर्थ-३, दिनांक २५.०१.२०१९, अनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

६. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या *www.maharashtra.gov.in* या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०३०७१९५३५०५८२९ असा आहे. हा शासन निर्णय डीजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SWAPNIL
GOPAL BORSE

Digitally signed by SWAPNIL GOPAL BORSE
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=c6a6e7cad855fc787a96e36f11fbc87a9f66cfd9bad01184493f2735ad885627, postalCode=400032, street=2ND FLOOR,MANTRALAYA,MADAME CAMA MARG,MUMBAI, serialNumber=8538cd1e408948f7d025537d5f6589bd8958d1b95322e66d2cc5edf89ad0d79e, ou=HOME DEPT, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=SWAPNIL GOPAL BORSE
Date: 2019.03.07 19:55:20 +05'30'

(स्वप्नील गोपाल बोरसे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१) मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
२) मा. मुख्य मंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा. विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा/ विधानपरिषद, यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई.
४) मा. गृह राज्यमंत्री (शहरे/ ग्रामीण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
६) व्यवस्थापकीय संचालक, म.रा. पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्या., मुंबई.
७) पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, मुंबई.

प्रत-

१) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
२) निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई.
३) प्रधान महा लेखापाल (लेखापरीक्षा/ लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई.
४) महा लेखापाल (लेखापरीक्षा/ लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर.
५) जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे.
६) जिल्हा कोषागार अधिकारी, गडचिरोली.
७) कार्यासन अधिकारी (अर्थसं.-१), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
८) कार्यासन अधिकारी (व्यय-७/ विनियम), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
९) निवड फाईल, पोल-७.